

डॉ. नितीन परख
वास्तूतज्ज्ञ

# फेंगशुई फ्लाईंग स्टार



## मोकळ्या रेषा आणि घातक आकृतीबंध

एखाद्या घरासमोर विशिष्ट मोकळ्या रेषा किंवा आकृतीबंध थेट मिळत असतात. अशा घातक रेषांमुळे घरामध्ये अनेक धोकादायक गोष्टी होऊ शकतात. थोडक्यात असे घर दुर्भाग्यपूर्ण होऊ शकते. घराच्या प्रवेशद्वारातून घातक रेषा येतात किंवा नाही हे ठरविण्याची एक विशिष्ट पद्धत आहे. घातक रेषा ठरविण्यासाठी आपण कंपासबॉक्समधील संपूर्ण वर्तुळाकार कोनमापक वापरू शकतो (नेहमीचा अर्धवर्तुळाकार कोनमापक नको).

मोकळ्या रेषा खालील पद्धतीने काढता येतात. महत्त्वाच्या चार मोकळ्या रेषा आहेत, त्यांना मृत्युरेषा (कार्डिनल लाइन्स) म्हणता येईल. वर्तुळाकार कोनमापकाच्या ०°, १८०° व २७०° या प्रमुख मृत्यु रेषा आहेत. जेव्हा एखाद्या घराचे प्रवेशद्वार बरोबर ०°, १०°, १८०° किंवा २७०°वर असते तेव्हा अशी घरे ही अपवित्र घरे समजली जातात. थोडक्यात घराचे प्रवेशद्वार ०° म्हणजे बरोबर पूर्वेकडे, ९०° म्हणजे बरोबर उत्तरेकडे, १८०° म्हणजे नेमके पश्चिमेकडे आणि २७०° म्हणजे बरोबर दक्षिणेकडे असते तेव्हा अशी घरे अतिशय धोकादायक आणि घातक असतात. देवालये किंवा स्मशानघरांची प्रवेशद्वारे या दिशांना असती तर ते शुभ समजले जाते. परंतु आपण राहात असलेल्या वास्तूंची प्रवेशद्वारे अशा दिशांना म्हणजेच मृत्युरेषेकडे असू नयेत. घरांची प्रवेशद्वारे या घातक दिशांच्या कमीत कमी १° तरी कोन करून असणे आवश्यक आहे.

वरील चार घातक दिशांशिवाय आणखी आठ दिशा देखील अशुभ किंवा घातक ठरू शकतात. आग्नेश, नैऋत्य, वायव्य आणि ईशान्य या दिशा म्हणजेच ४५°, १३५°, २२५°आणि ३१५° या दिशांनाही घरांची प्रवेशद्वारे असू नयेत. वरील चार उपदिशांशिवाय आणखी चार दिशा देखील घातक रेषा म्हणून समजल्या जातात. या दिशा मुख्य दिशा आणि उपदिशांच्या बरोबर मध्यावर असतात. म्हणजेच कोनमापकाच्या २२.५ अंश, ६७.५°, ११२.५°, १५७.५°, २०२.५°, २४७.५°, २९२.५° आणि ३३७.५° दाखवणाऱ्या आठ रेषा देखील

रिकाम्या किंवा घातक रेषा समजल्या जातात.

**घातक रेषा आणि आकृतिबंधावर करावयाचे उपाय**

घराचे मुख्य प्रवेशद्वार जर वर सांगितलेल्या घातक रेषांच्या दिशेने असेल तर अशा दारांना १ किंवा २ अंशाचे पॅडिंग टाकून त्या दाराची दिशा १ किंवा २ ने वळवावी. या उपाययोजनेमुळे घातक रेषेमुळे होणारे दुष्परिणाम पुष्कळ कमी होतात. समजा आपल्या घराचे प्रवेशद्वार बरोबर ०°च्या दिशेने येत असेल तर दाराच्या दोन्ही बाजूंना कोणत्याही प्रकारचे पकिंग करून दाराची दिशा २°नी बदलावी. अशाच प्रकारे इतर तीन प्रमुख घातक रेषा म्हणजे ९०°, १८०° आणि २७०°च्या दिशेने घराचा प्रमुख मुख्य दरवाजा असेल तर उपाययोजना करता येते. परंतु ही उपाययोजना करण्यापूर्वी ती वास्तू कोणत्या साली बांधली गेली त्याचेही कॅलक्युलेशन फेंगशुई शास्त्राप्रमाणे करणे गरजेचे आहे.

समजा घराचा मुख्य दरवाजा ३३७.५° म्हणजेच ती उत्तर दिशा आणि वायव्य दिशेच्या मध्यावर आहे. हा दरवाजा २°नी वळवणे आवश्यक असले तरी फेंगशुईच्या फ्लाईंगस्टार शास्त्राप्रमाणे हे ठरविताना दरवाजाची दिशा उत्तरेकडे ३°ने वळवावी किंवा वायव्येकडे १°ने वळवावी हे ठरविताना फ्लाईंगस्टारचा तक्ता विचारात घेणे गरजेचे आहे. हे करीत असताना देखील वास्तूच्या बांधकामाचे वर्ष आणि इतर गोष्टींचा अभ्यास करणे अतिशय गरजेचे असते. थोडक्यात यासाठी फेंगशुई शास्त्राच्या तज्ज्ञाचा सल्ला घेणे हितकारक ठरेल.




**दिशांची आकृती :**

१) मुख्य घातक दिशा (एकूण ४) ० अंश (पूर्व), ९० अंश(उत्तर), १८० अंश (पश्चिम), २७० अंश (दक्षिण)

२) उप मुख्य दिशा (एकूण ४) ४५ अंश (ईशान्य), १३५ अंश (वायव्य), २२५ अंश (नैऋत्य), ३१५ अंश (आग्नेय)

३) अन्य घातक दिशा (एकूण ८) २२.५ अंश, ६७.५ अंश, ११२.५ अंश, १५७.५ अंश, २०२.५ अंश, २४७.५ अंश, २९२.५ अंश, ३३७.५ अंश